पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७७**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २४/०६/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.२४/०६/२०२०** रोजी दु.०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे मयूर पांडुरंग
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.तुपे – सह शहर अभि. तथा प्र.अति.आयुक्त(३), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – शहर अभियंता, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.चितळे, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.लडकत, मा.गलबले, मा.घोडे, मा.मोरे, मा.देशमुख, मा.पोरेड्डी – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(मा.स्थायी समिती सभेमध्ये अतिरिक्त आयुक्त अजित पवार यांचा विशेष उल्लेखनीय कामगिरी बद्दल सभापती संतोष लोंढे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ताथवडे येथील बालाजी कॉलेज हॉस्टेल येथे महानगरपालिका हद्दीतील काही कोरोना बाधित रुग्णांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यातील काही जणांनी उपचार पूर्ण होण्यापूर्वी तेथून बाहेर पडण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच अतिरिक्त आयुक्त अजित पवार यांनी तेथे धाव घेवून संबधित कोरोना बाधितांच्या गराड्यामध्ये जाऊन कोरोना बाधितांना पलायन करण्यापासून रोखले व प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच लॉककडाऊनच्या काळामध्ये जाधववाडी चिखली येथे रस्त्यामध्ये वाहन उपलब्ध नसल्याने अडकून पडलेल्या गरोदर महिलेला मदत विद्युत विभागाच्या वाहनचालक रामदास गवारी, वायरमन अंकुश लांडगे, मदतनीस विलास माने यांनी तातडीने महापालिकेच्या वाहनाने रुग्णालयामध्ये दाखल करून महिलेचे प्राण वाचवले त्याबद्दल संबंधित वाहनचालक, वायरमन व मदतनीस यांचाही सत्कार करण्यात आला.)

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -**

विषय क्र.११) प्रभाग क्र.१० मध्ये महात्मा फुले स्मारक परिसरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामासाठी वास्तूविशारद म्हणून नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.१२) वायरलेस रिपीटर करिता ड्युप्लेक्स फ्रिक्वेंन्सी लायसन्सबाबत..

विषय क्र.१३) चिखली से.क्र.१७ व १९ मध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरकुल योजनेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील इमारत क्र.D5, D6, D7 व D8 या कोविड-१९ अंतर्गत येणा-या रुग्णांसाठी Isolation Ward म्हणून उपलब्ध करुन देणेबाबत.

विषय क्र.१४) “कोरोना” विषाणू COVID 19 च्या प्रादुर्भाव कालावधी मधील अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील विविध इमारती व दवाखान्यांमध्ये विविध तात्पुरती विद्युत विषयक कामे करणे.

विषय क्र.१५) मा.स्थायी समिती ठराव क्र.७१६३ दि.१७/०६/२०२० मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.राजेंद्र लांडगे, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१६) नागरिकांची कोरोना १९ स्वॅपची मोफत तपासणी करणेबाबत – मा.मयूर कलाटे, मा.पंकज भालेकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १७/०६/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७१८३ विषय क्रमांक – १

दिनांक – २४/०६/२०२० विभाग – इ क्षेत्रिय, पा.पु.

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इक्षेका/पापु/०१/कावि/२०५/२०२०,दि.२९/०४/२०२०

विषय – इ प्रभागातील विविध टक्यांवरून पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणे (सन २०१८-१९) या कामास येणा-या खर्चास व अंतर्गत वाढ/घट करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत..

विषय क्र.१ चा विचार दि.१५/०७/२०२० च्या सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८४ विषय क्रमांक – २

दिनांक – २४/०६/२०२० विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/१८१/२०२०, दि.०८/०६/२०२०

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला वर्ष भरामध्ये विविध मान्यवर भेट देत असतात. अति विशेष मान्यवरांना भेट म्हणून वेळोवेळी मा.महापौर व मा.आयुक्त यांचे सूचनेनुसार विविध भेट वस्तू देण्यात येतात. मा.पंतप्रधान हे बालेवाडी येथे आले असता त्यांच्या व इतर मान्यवरांच्या स्वागतासाठी तत्कालीन मा.महापौर राहुल जाधव यांच्या सूचनेनुसार ५ भक्ती शक्ती शिल्पे, तत्कालीन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी येथे स्वागतासाठी तत्कालीन मा.महापौर नितीन काळजे यांच्या सूचनेनुसार २ भक्ती शक्ती, आंतरराष्ट्रीय टेनिसपटू लिअँडर पेस, रामनाथ रामकुमार, अर्जुन कढे व इतर मान्यवरांच्या सेक्टर २५, निगडी येथील भेटी दरम्यान स्वागतासाठी मा.आयुक्त यांच्या सुचनेनुसार ५ भक्ती शक्ती शिल्पे अशी एकूण १२ भक्ती-शक्ती शिल्पे मे.आल्हाट आर्ट स्टुडीओ यांच्याकडून तातडीच्या आवश्यकतेनुसार थेट पद्धतीने खरेदी केलेली आहेत. मे.आल्हाट आर्ट स्टुडीओ यांचेकडून २ फुटी भक्ती-शक्ती शिल्पाकरिता प्रती नग र.रु.७,०००/- + १२% जीएसटी या दराने ७ शिल्पे तर १४ इंची भक्ती-शक्ती शिल्पाकरिता प्रती नग र.रु.१४,०००/- + १२% जीएसटी या दराने २ शिल्पे अशी एकूण र.रु.७८,४००/- (अक्षरी र.रु.अठ्ठ्याहत्तर हजार चारशे फक्त) ची ९ शिल्पे सर्व करांसहित खरेदी केलेली आहेत. त्याची बिले त्यांनी सादर केली असून ती त्यांना अदा करणे आवश्यक आहे तरी मे.आल्हाट आर्ट स्टुडीओ यांचे बिल अदा करणेकामी येणा-या र.रु.७८,४००/- (अक्षरी र.रु.अठ्ठ्याहत्तर हजार चारशे फक्त) च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८५ विषय क्रमांक – ३
दिनांक – २४/०६/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा. झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभा/१५/कावि/२६२/२०२०,दि.१२/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.जयश्री कटारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र आ.व्य./पगस/कावि/905/2019 दि.11/08/2019 व पत्र क्र.आ.व्य./पगस/कावि/904/2019 दि.11/08/2019 नुसार कोल्हापुर व सांगली जिल्हा येथील अतिवृष्टी पुर परिस्थिती व तदनंतरच्या उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साधन सामुग्रीचा पुरवठा करणेसाठी खालील प्रमाणे पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले होते.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | पुरवठा आदेश क्रमांक | आदेशाची रक्कम रुपये | वाहतूक खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. रेखा इंजिनिअरिंग वर्क्स चिंचवड, पुणे 19 | मभां/15/कावि/369/2019 दि. 12/08/2019 | 70,000/- | 10620/-- | 80,620/- |
| 2 | मे. शिवसमर्थ एंटरप्रायजेस निगडी, पुणे 44 | मभां/15/कावि/368/2019 दि. 12/08/2019 | 7,18,200/- | 32,000/- | 7,50,200/- |
| 3 | मे. शुभम उद्योग, पिंपरी पुणे 18. | मभां/15/कावि/370/2019 दि. 12/08/2019 | 12,735/- | - | 12,735/- |

त्यानुसार सबंधित पुरवठादार यांनी आदेशातील नमुद केलेल्या साहित्याचा पुरवठा सांगली व कोल्हापुर येथे मुदतीत केलेला असून पुरवठा केलेल्या साहित्याची देयके अदायगीकामी वाहतूक खर्चासह सादर केलेली आहेत. मा.जयश्री कटारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र. आ.व्य./पगस/कावि/905/2019 दि. 11/08/2019 अन्वये सदर साधनसामुग्रीच्या खरेदी व पुरवठा यांची देयके जिल्हाधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेकडून अदा केली जातील असे कळविले होते. त्यानुसार सबंधित पुरवठादारांची देयके अदायगीकामी जिल्हाधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन कक्ष पुणे यांचेकडे पाठविणेत आली असता आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी पत्र क्र. आव्यप्र/197/2019 दि. 23/12/2019 अन्वये सांगली व कोल्हापुर जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती व तदनंतरच्या उपाय योजनांसाठी आवश्यक लागणारे साहित्याचा पुरवठा अनेक सामाजिक संस्था व महानगरपालिका यांनी केलेला होता व त्याची सर्व देयके सबंधित संस्था व महानगरपालिका यांनी अदा केलेली आहेत तसेच पुणे महानगरपालिकेमार्फत अतिवृष्टी व पुर परिस्थिती साठी वाहन व्यवस्था करणेत आलेली होती व त्यासबंधीचे देयके त्यांनीच अदा केलेली आहेत असे कळविले आहे. सबब कोल्हापुर व सांगली जिल्हा येथील अतिवृष्टी व पुर परिस्थिती व तदनंतरच्या उपाय योजनांसाठी आवश्यक साधन सामुग्री प्रचलित दराने (निविदेनुसार) खरेदीसाठी व त्यासबंधित पुरवठादार यांची देयके अदा करण्यासाठी येणा-या रुपये 8,43,555/- चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८६ विषय क्रमांक – ४

दिनांक – २४/०६/२०२० विभाग – स्थापत्य EWS प्र

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/ EWS प्र/२७०/२०२०, दि.१५/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

JnNURM अंतर्गत चिखली से.क्र.१७ व १९ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचे काम चालू आहे. सदर प्रकल्पास दि.१०/१०/२०११ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून पर्यावरण दाखला प्राप्त झालेला होता. परंतू, सदर प्रकल्पाच्या आराखड्यास सुधारीत बांधकाम परवानगी घेतल्यामुळे पुनःश्च पर्यावरण दाखला मिळणेकामी अर्ज करण्यात आला. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दि.२८/०२/२०२० रोजी सुधारीत पर्यावरण दाखला मिळालेला आहे. सदर दाखल्यातील पान क्र.९, General Condition अट क्र.VI नुसार Consent to Establish घेणे अनिवार्य आहे. सदर Consent to Establish घेणेकामी MPCB ने मागणी केलेप्रमाणे र.रु.७,९२,६४२/- (अक्षरी र.रु.सात लाख ब्याण्णव हजार सहाशे बेचाळीस फक्त) इतकी फी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडे RTGS / NEFT द्वारे भरणेचे आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

**Bank Details for RTGS/NEFT**
Account Name: **Maharashtra Pollution Control Board**
Bank Name: **State Bank of India**
Bank Account No: **33874078751**
Bank Account Type: **Current Account**
Bank Address: **76-A, Rafi Ahmed Kidwai Rd, Gujarati Kelwani Mandal School, Matunga Br. Mumbai- 400 015.**
IFSC Code: **SBIN0005350**
MICR Code: **400002056**
Email: **aao_ecmpcb@mpcb.gov.in**

तरी सदर प्रकल्पास Consent to Establish मिळणेकामी र.रु.७,९२,६४२/- (अक्षरी र.रु.सात लाख ब्याण्णव हजार सहाशे बेचाळीस फक्त) इतकी फी RTGS/NEFT द्वारे Maharashtra Pollution Control Board यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८७ विषय क्रमांक – ५

दिनांक – २४/०६/२०२० विभाग –वैद्यकिय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१)यांचे पत्र क्र.मासाभां/२/कावि/४३०/२०२०,दि.१५/०६/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

चीन देशामध्ये कोरोना विषाणू आजाराचा उद्रेक सुरु आहे. तसेच चीन व्यतिरिक्त इतर अनेक देशांमध्येही या आजाराचे रुग्ण आढळले आहेत. पुणे जिल्ह्यामध्येहीकोरोना बाधित रुग्ण आढळुन आलेले असुन सद्यस्थितीमध्ये पिं.चिं.मनपा मध्येकोरोना बाधित व संशयित रुग्ण आढळुन आले

आहेत. कोरोना बाधित व संशयित रुग्णांपासून रोगाचा प्रसार थांबविणे व त्वरीत प्रतिबंधात्मक उपाययोजनाकरणेकरीता सदरील कोरोना बाधित अथवा संशयित रुग्ण यांना विलगीकरण कक्षामध्येठेवणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. एच रुग्णालय, नविन भोसरी रुग्णालयाच्या नविन इमारतीमध्ये विलगीकरण कक्ष सुरु करण्यात आलेले आहेत तसेच नवीन जिजामाता इतर ठिकाणी कक्ष तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर कक्षामधील रुग्ण/अधिकारी/कर्मचारी यांना सकाळचा नाश्ता, दोन वेळचा चहा वदोन वेळचे जेवन या प्रकारचा आहार तसेच ज्येष्ठ वैदयकिय अधिकारी नविन भोसरी रुग्णालय यांनी दिनांक 25/3/2020 रोजीच्या पत्रान्वये आहारा बरोबर पाणीची प्रति रुग्ण २-३बॉटल व बिस्कीटचा१ पुडा देण्याबाबत मागणी केली आहे. दिंनाक १३/३/२०२० पासुन उक्त सुविधा देण्यात येत आहेत. सदर सुविधा दिनाक १३/६/२०२०. पर्यत कोरोनाचा वार्डमध्ये पाणीबॉटल व बिस्कीट देण्यात आली आहेत मे.क्वॉलिटी केटरर्स, वाय.सी.एम.रुग्णालय, पिंपरी यांचेकडील दरपत्रक प्राप्त केलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| अनु.क्र | साहित्याचे नाव | स्पेसिफिकेशन | दर सर्व करासहित व पोहच |
|---|---|---|---|
| १ | पाणी बॉटल | १ लिटर (ISO) | २०/- |
| २ | बिस्कीट | Gulucose-60grm ,Mari,-83 grmGood day-60grm | १०/- |

वरील प्रमाणे दर मा.आयुक्त यांचेकडून दि.३०.०३.२०२० रोजी स्विकृत करणेत आलेले आहेत. या दराप्रमाणे एकूण अंदाजे र.रु.८,००,०००/- (अक्षरी र.रू.आठ लाख फक्त) चे खर्चास व संबंधीतांशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८८ | विषय क्रमांक – ६

दिनांक – २४/०६/२०२० | विभाग – झो.नि.पु.,स्थापत्य

सुचक – मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ– मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५४२/२०२०
दि.१९/६/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्य झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते ६) मधील कामाचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे भाववाढ कलम लागूअसल्यास,भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्येकंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणेबंधनगारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामाकरून कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८९ विषय क्रमांक – ७
दिनांक – २४/०६/२०२० विभाग –मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/४९७/२०२०,दि.२९/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी मे.हिन्दुस्तान एंटिबायोटिक्स लि. पिंपरी १८ (भारत सरकारचा उपक्रम) यांचे कडुन र.रू.४९.७२ (१००मिली) प्रती नग याप्रमाणे एकुण १२,०६७ नग (बारा हजार सदुसष्ट फक्त) सॅनिटायझर (१००मिली) थेट पध्दतीने खरेदी करणेस त्यासाठी येणा-या एकुण र.रु.५,९९,९७१/- (अक्षरी र.रू.पाच लाख नव्याण्णव हजार नऊशे एक्काहत्तर फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.हिन्दुस्तान एंटिबायोटिक्स लि. पिंपरी १८ (भारत सरकारचा उपक्रम) यांचे कडुन करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण क्रमांक ५ (२) (२) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९० विषय क्रमांक – ८
दिनांक – २४/०६/२०२० विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा. शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/११३/२०२०,दि.१७/०६/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.92/18/2019-20 अन्वये प्रभाग क्र.१९ मधील गोलांडे उद्याना शेजारील सी.डी. वर्कची उर्वरित कामे करणेकामी M/s.JP Infra नि.र.रू.37,49,153/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख एकोणपन्नास हजार एकशे त्रेपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,58,813/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,58,813/- पेक्षा 21.21% कमी म्हणजेच र.रु.28,82,779/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.54,840/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.35,500/- = एकुण र.रु.29,73,119/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्या वरील वस्तु व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटीं नुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९१ | विषय क्रमांक – ९
दिनांक – २४/०६/२०२० | विभाग – स्थापत्य ह मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/२२८/२०२०,दि.१७/०६/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.90/1/2019-20 अन्वये फुगेवाडी येथील शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण करणेकामी मे.गौरव सुनिल आल्हाट नि.र.रू.41,29,284/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख एकोणतीस हजार दोनशे चौ-याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,81,897/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्या नुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,81,897/- पेक्षा 11.00% कमी म्हणजेच र.रु.36,32,888/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,287/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.44,100/- = एकुण र.रु.36,80,275/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९२ | विषय क्रमांक – १०
दिनांक – २४/०६/२०२० | विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/४२०/२०२०,दि.१९/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१५/०१/२०१९-२० सन २०१९-२० करिता फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी वाल्व्ह ऑपरेशन व्यवस्थापन करणेकरिता मजूर पुरविणेकामी (२०१९-२०) या कामासाठी निविदा र.रू.७४,९७,७४८/- (अक्षरी र.रू.चौ-याहत्तर लाख सत्याण्णव हजार सातशे अठ्ठेचाळीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून निविदा र.रु.७४,९७,७४८/- वर दर मागविणेत आलेले आहेत. त्यानुसार सदर काम मे.राजलक्ष्मी स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या ठेकेदाराकडून निविदा र.रु.७४,९७,७४८/- पेक्षा सुधारितदर -०.९४% कमी दराची म्हणजेच र.रू.७४,२७,२६९/- रॉयल्टीची रक्कम रु.०/-, मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम रु.०/- = एकूण र.रु.७४,२७,२६९/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतनदर यांचे नुसार वाढ/घट अदा करणेस व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तू व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल

करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७१९३ विषय क्रमांक – ११
दिनांक – २४/०६/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/३७/२०२०,दि.२४/०६/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या प्रभाग क्र.१० मध्ये महात्मा फुले पुतळा आ.क्र.९७ स.नं.१५५ वर अस्तित्वात असून सदर ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारणेची मागणी जन सामान्य नागरीकातून तसेच स्थानिक नगरसदस्य यांचेमार्फत सतत होत आहे. सदर ठिकाणी सावित्रीबाई फुले यांचे स्मारक केलेस महिला वर्गात एक प्रकारचे प्रेरणास्थान प्राप्त होईल. सदर प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण असले कारणाने नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिद्ध करणे तसेच निविदा पुर्व व निविदा पश्चात ही सर्व कामे करणेसाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबत मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर/सल्लागार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यासाठी दि.१७/०६/२०२० रोजी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत दि.१९/०६/२०२० रोजी दु.३.०० पर्यंत एकूण ०३ सीलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. सदर कोटेशन दि. १९/०६/२०२० दु.३.०० वाजता उघडण्यात आले असून सदर तक्यानुसार मे.सृष्टी डिझायनर यांनी लघुत्तम दर **१.९९**% (जीएसटी सोडून) सादर केल्याचे दिसून येते, तरी मे.सृष्टी डिझायनर यांनी लघुत्तम दर सादर केल्याने त्यांची सदर कामाच्या निविदापूर्व व निविदापश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस व प्रभाग क्र.१० मध्ये महात्मा फुले स्मारक परिसरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामासाठी मे.सृष्टी डिझायनर यांची लघुत्तम दर १.९९% नुसार निविदापूर्व व निविदापश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेबाबत व त्याकामी येणारी फी १.९९% (जीएसटी सोडून) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९४ विषय क्रमांक – १२
दिनांक – २४/०६/२०२० विभाग – दूरसंचार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त-१ यांचेकडील पत्र क्र.दूसंचार/३/कावि/३९/२०२०,दि.२४/०६/२०२०

मा.अति.आयुक्त-१ यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा वाढते कार्यक्षेत्र विचारात घेता अग्निशामक विभागाचे दूर पल्ल्याचे संदेश दळण वळणनाकरिता मनपाने केंद्र शासनाने संचार मंत्रालयाकडून ड्युप्लेक्स फ्रिक्वेंसी घेतली असून त्याची दि.०१/०७/२०२० ते दि.३०/६/२०२१ अखेरची लायसन्स नुतणीकरणाची फी र.रू.२,२०,५००/- (अक्षरी र.रू.दोन लाख वीस हजार पाचशे फक्त) केंद्र सरकारचे संचार मंत्रालय, नवी दिल्ली यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९५ विषय क्रमांक – १३

दिनांक – २४/०६/२०२० विभाग – स्थापत्य EWS प्र

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त-२ यांचेकडील पत्र क्र.स्था/EWSप्र/२९३/२०२०,दि.२४/०६/२०२०

मा.अति.आयुक्त-२ यांनी शिफारस केलेप्रमाणे –

चिखली से.क्र.१७ व १९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांसाठी घरकुल योजनेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील इमारत क्र. D5,D6,D8व D7 कोविड-१९ रूग्णांसाठी व्यवस्था करावी असे ठरले आहे. पहिल्या टप्प्यात २ इमारती D5 व D6 या त्वरीत दिनांक २७/०६/२०२० पर्यंत राहणे योग्य करुन द्यावेत व उर्वरीत D8 व D7 दिनांक ०५/०७/२०२० पर्यंत राहणे योग्य करुन द्यावेत असे ठरले आहे. सदर सदनिकामध्ये फक्त इलेक्ट्रीकल पॉईंट असल्याने इलेक्ट्रीकल बल्ब, इलेक्ट्रीकल फॅन व मेन कनेक्शन विद्युत विभागामार्फत/ भांडार विभागामार्फत देणेचे ठरलेले आहे. सद्यस्थितीत कोविड-१९ अंतर्गत येणा-या रुग्णांसाठी Isolation Ward उपलब्ध करुन देण्या अंतर्गत उपरोक्त संदर्भा अंतर्गत मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचेकडे बैठक झालेली आहे. सदरचे बैठकीमध्ये वरील ४ इमारती D5,D6,D8 व D7 या क्रमाणे Isolation Ward म्हणून उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. त्यास अनुसरून सदर इमारतीमधील प्रत्येक सदनिकेमध्ये हॉल, बेडरूम, किचन, संडास , बाथरूम व बाल्कनीमध्ये इलेक्ट्रीकल बल्ब बसविणे आवश्यक आहे. तसेच पॅसेजमध्ये व तळमजल्यावर इलेक्ट्रीक बल्ब बसविणे आवश्यक आहेत.

1. सदनिका - ६ बल्ब X ४२ सदनिका = २५२ बल्ब
2. पॅसेज - ३ बल्ब X७ मजले = २१ बल्ब
3. तळमजला, पॅसेज - १० बल्ब
4. टेरेस - ४ बल्ब

असे एकुण सुमारे एका इमारतीसाठी २९० इलेक्ट्रीकल बल्ब आवश्यक असून त्याप्रमाणे ४ इमारतींसाठी ११६० इलेक्ट्रीकल बल्ब आवश्यक आहेत. तसेच सदनिकेमधील हॉल व बेडरुम यामध्ये इलेक्ट्रीकल फॅन्स उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

१. सदनिका - ४२ सदनिका X२ फॅन = ८४ फॅन

असे एकुण सुमारे एका इमारतीसाठी ८४ इलेक्ट्रीकल फॅन आवश्यक असून त्याप्रमाणे ४ इमारतींसाठी ३३६ इलेक्ट्रीकल फॅन आवश्यक आहेत. तसेच इमारतीमधील सदनिकांना गरम पाण्यासाठी वॉटर हिटर (गिझर) बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार एका इमारतीतील ४२ सदनिकांसाठी ४२ वॉटर हिटर (गिझर) त्याप्रमाणे ४ इमारतींसाठी १६८ वॉटर हिटर (गिझर) आवश्यक आहेत. तरी वरीलप्रमाणे इलेक्ट्रीकल बल्ब, इलेक्ट्रीकल फॅन व वॉटर हिटर (गिझर) तसेच मेन मिटरचे कनेक्शन यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९६ विषय क्रमांक – १४

दिनांक – २४/०६/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/८/कावि/१६०/२०२०,दि.०८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे अ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत प्रभाग क्र.१९ मधील आनंदनगर झोपडपट्टीमध्ये कोरोना बाधित रूग्ण आढळून आलेले आहेत. सदरचा बाधीत रुग्णांचे सहवास/संपर्क आलेल्या नागरिकांचे विलगीकरण करणेत येऊन त्यांना प्रभाग क्र.१५ मधील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी येथे स्थानांतरित करणेत आलेले आहे व चिंचवड म.न.पा. दवाखाना मधून सदर कामाचे नियंत्रण करणेत येत आहे. सद्य काळात पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (आकुर्डी) आणि चिंचवड दवाखाना व इतर ठिकाणी अखंडित वीजपुरवठा होणे कामी तात्पुरत्या स्वरूपात जनित्रसंच बसविणे आवश्यक आहे. सदर तात्पुरत्या विद्युत व्यवस्थेकरिता अंदाजे (र.रु.९,९९,८००/- + GST १,७९,९६४/-एकूणर.रु.११,७९,७६४/-) खर्च अपेक्षित आहे. अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विद्युत विभागातील तात्पुरती प्रकाश व्यवस्था व तात्पुरते जानित्र संच व्यवस्था करणेकामी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांचे मार्फत नि.क्र.३/७-२०१९-२० मधील ०६% कमी या दराने काम चालू आहे. सदर काम याच दराने करणेकामी सदरच्या एजन्सीने तयारी दर्शविले आहे. सबब मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांचेकडून ०६ महिने कालावधीकरिता र.रु.११,७९,७६४/- (अक्षरी र.रू.अकरा लाख एकोणऐंशी हजार सातशे चौसष्ठ फक्त) या रक्कम पूर्व स्वीकृत दर ०६% कमी या दराने करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९७ विषय क्रमांक – १५

दिनांक – २४/०६/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव–

मा.स्थायी समिती ठराव क्र. ७१६३ दि.१७/०६/२०२० मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करणेत यावी हि विनंती मा.आयुक्त यांचेकडील विषय पत्र क्र.मभां/८/कावि/७४६/२०२० दि.०८/०६/२०२० नुसार मे.केप्स फार्मा, मुंबई यांचेकडून १०,०००/- पीपीई कीट खरेदी करणेस व त्याकामी येणा-या

र.रु.८२,७६,२००/- + GST इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच कोवीड - १९ कोरोनाचा प्रादुर्भाव विचारात घेता यापुढील काळात पीपीई कीटची आवश्यकता भासल्यास केप्स फार्मा ही मुंबई ची एजन्सी असल्याने प्रस्तूत निविदेतील मे.कोठारी मेडिकल ही स्थानिक एजन्सी असल्याने त्यांच्याकडून L1 केप्स फार्मा यांनी दिलेल्या (८२७.६२+ GST प्रती कीट) या दराने पीपीई कीट खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१९८ विषय क्रमांक – १६

दिनांक – २४/०६/२०२०

सुचक – मा.मयुर कलाटे अनुमोदक – मा.पंकज भालेकर

संदर्भ – मा.मय्रुर कलाटे, मा.पंकज भालेकर यांचा प्रस्ताव–

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांचे कोरोना-१९ स्वॅपची तपासणी मनपाच्या वतीने (खाजगी व सरकारी लॅब मध्ये) मोफत करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/६०६/२०२०
दिनांक – २४/०६/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

**(क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५४२/२०२० दि.१५/०६/२०२० विषय क्र.६ चे लगत)**

(७)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८.

झोनिपु स्थापत्य विभाग,विषयपत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/ ५४२/२०२० दिनांक १५ /०६ /२०२०.

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्र. | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग रक्कम वगळुन निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरीयल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे(+त्यावरील वस्तू व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| ०१ | मे.सिध्दीकी प्लबीग अॅन्ड ड्रेनेज सिव्हील कॉन्ट्रक्टर | ५/५-२०१८-१९ | प्रभाग क्र.३० मध्ये गूलाबनगर झोपडपट्टीमध्ये बंद शौचालय पाडून व्यायाम शाळा बांधणे. | २८/११/१९ | झोनिपु/स्था/नि/कावि/ ५३१/ २०२० | २८/०२/२०२० | २१०२३७९ | २०२०२८१ | ४९९५० | ३२१४८ | ०.१५% कमी | २०,९९,३४८/- |
| ०२ | मे.श्री गणेश कंन्स्ट्रक्शन | ५/९-२०१८-१९ | बौध्दनगर एमआयडीसी परिसरात नाल्याशेजारी पुरुषांसाठी शौचालय बांधणे. | २२/०१/२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ५३५/ २०२० | १२/०३/२०२० | २११६९७३ | २०४७१३० | १९८९५ | ४९९५० | ५% जास्त | २२,१९,३३२/- |
| ०३ | मे.यश किर्ती डेव्हलपर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर | १/२३-२०१९-२० | प्रभाग क्र.३० मधील महात्माफुलेनगर (दापोडी) झोपडपट्टीतील स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणे. | ०४-०२-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ५३०/ २०२० | २८-०२-२०२० | १७९९५७७ | १७४५५९९ | १०५७८ | ४३४०० | २५ टक्के कमी | १३,६३,१७७/- |
| ०४ | मे.विवेक कंन्स्ट्रक्शन | १/१०८-२०१९-२० | सन १९-२० मध्ये प्रभाग क्र.१३ से.क्र.२२ अण्णाभाऊसाठे वसाहत येथील २५६ व २७६ गाळे परिसरातील झोपडपट्टीमध्ये शौचालय,गटर,पाथवेची देखभाल दुरुस्ती करणे व इतर अनुषांगिक स्थापत्य विषयक दे.दु.कामे करणे. | ०४-०२-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ५३४/२०२० | १२-०३-२०२० | १४९१४२३ | १४३०९६५ | ११४६० | ४९००० | २५% कमी | ११,३३,६८४ |

(२)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८.

झोनिपु स्थापत्य विभाग,विषयपत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/ ५६२ /२०२० दिनांक १५/०६/२०२०.

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्र. | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग रक्कम वगळुन निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरीयल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे(+त्यावरील वस्तू व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| ०५ | मे.विवेक कंन्स्ट्रक्शन | १/११५-२०१९-२० | सन २०१९-२० मध्ये प्रभाग क्र.१३ से.क्र.२२ स्वच्छ भारत अभियान अतंर्गत शौचालय देखभाल दुरुस्ती व इतर अनुषांगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०४-०२-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ५३२/ २०२० | १२/०३/२०२० | १२४३८०[illegible] | ११८६८७२ | ७९३१ | ४९,००० | २५% कमी | ९,४७,०८५/- |
| ०६ | मे.विवेक कंन्स्ट्रक्शन | १/१२६-२०१९-२० | सन २०१९-२० मधील फ प्रभागाअंतर्गत ओटा स्किम से.क्र.२२ येथील विविध झोपडपट्टीतील चौकाची देखभाल दुरुस्ती करणे व सभोवतालच्या परिसरात आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ०४-०२-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ५३३/ २०२० | १२/०३/२०२० | २०६७७२७ | २००७६६८ | ११०५९ | ४९००० | १८.०९% कमी | १७,०४,५३९/- |

प्रपत्र अ ०१ ते ०६

सह शहर अभियंता
झोनिपु स्थापत्य विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.